# १४. अप्पाजींचे चातुर्य

खूप जुनी गोष्ट. विजयनगरमध्ये तेव्हा कृष्णदेवराय राज्य करत होते. त्यांच्या प्रधानांचे नाव होते अप्पाजी. अप्पाजी फार चतुर होते.



उत्तरेकडे कलिंग राज्य होते. त्या राज्याच्या राजाला वाटले, एकदा आपणही अप्पाजींची चतुराई पाहावी म्हणून त्याने कृष्णदेवरायांना निरोप पाठवला. 'तुमच्या राज्यात फार चवदार कोबी पिकतात असे मी ऐकले आहे. त्यांचा आस्वाद घेण्याची माझी इच्छा आहे. माझ्यासाठी काही कोबी पाठवाल का?'

कलिंग राजाला कोबी पाठवण्याची कृष्णदेवरायांना इच्छा होती; पण ते पाठवणार कसे? त्या काळी आजच्यासारखी वाहतुकीची जलद साधने नव्हती. वाहतूक चालायची ती बैलगाड्यांमधून. बैलगाड्या कलिंग राज्यात पोहोचायला तीन महिने लागत. आपण चांगली, ताजी कोबी पाठवली, तरी ती कलिंग राज्यात जाईपर्यंत कुजून जातील असे राजाला वाटले.

आपली शंका त्यांनी अप्पाजींना सांगितली. अप्पाजी म्हणाले, "त्यात काय अवघड आहे? एका बैलगाडीत गाडीवानाला बसण्यापुरती जागा सोडून बाकीच्या जागेत माती भरा. त्या मातीत कोबीचे बी पेरा. रोज कोबीच्या रोपांना पाणी देत पुढे जायला गाडीवानाला सांगा. गाडी कलिंग राज्यात पोहोचेपर्यंत कोबी तयार होतील."

राजाने अप्पाजींच्या सांगण्याप्रमाणे एका गाडीत माती भरून त्यात कोबीच्या बिया पेरून ती कलिंग राज्याकडे रवाना केली. गाडीवान प्रवासात रोज कोबींच्या रोपांना पाणी देत होता.

तीन महिन्यांनी ती बैलगाडी कलिंग राज्यात पोहोचली. कलिंग राजाला ताजी कोबी मिळाली. त्याला आनंद वाटला. अप्पाजींचे कौतुकही वाटले.

अप्पाजींची आणखी एक परीक्षा घ्यावी, असे कलिंगच्या राजाला वाटले. त्याने एकसारख्या दिसणाऱ्या तीन मूर्ती मागवल्या व म्हणाले, 'या तीनही मूर्ती दिसायला सारख्या असल्या, तरी यांतली एक मूर्ती निकृष्ट आहे, दुसरी मध्यम दर्जाची आहे आणि तिसरी उत्कृष्ट आहे. या सारख्या दिसणाऱ्या तीन मूर्तींमधील उत्कृष्ट कोणती ते मला सांगा.'



त्यांच्यामधील फरक इतर कोणालाही ओळखता येईना. अप्पाजी म्हणाले, 'मी सांगतो फरक.' त्यांनी एक लवचिक तार घेतली. ती एका मूर्तीच्या कानात घातली. तेथून ती तार मूर्तीच्या तोंडातून बाहेर पडली.

अप्पाजी म्हणाले, ‘ही निकृष्ट मूर्ती.’

नंतर अप्पाजींनी ती तार दुसऱ्या मूर्तीच्या कानात घातली. ती तार त्या मूर्तीच्या दुसऱ्या कानातून बाहेर पडली. अप्पाजी म्हणाले, ‘ही मध्यम दर्जाची मूर्ती.’

तिसऱ्या मूर्तीवरही अप्पाजींनी हाच प्रयोग केला. त्या मूर्तीच्या कानात घातलेली तार तिच्या तोंडातून वा दुसऱ्या कानातून-कोठूनच बाहेर पडली नाही. अप्पाजी म्हणाले, ‘ही उत्कृष्ट मूर्ती.’

अप्पाजींनी कलिंग राजाला त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले- ‘आपण मागवलेल्या मूर्तींपैकी एका मूर्तीच्या कानात घातलेली तार तिच्या तोंडातून बाहेर पडली, ती निकृष्ट मूर्ती. एखादा माणूस ज्या अफवा ऐकतो, त्याचा खरेखोटेपणा पडताळून न पाहता, जर तो त्या दुसऱ्यांना सांगू लागला, तर त्याचे व समाजाचेही हित होत नाही.’ या मूर्तीचा असा अर्थ होतो.

‘दुसऱ्या मूर्तीच्या एका कानातून घातलेली तार त्या मूर्तीच्या दुसऱ्या कानातून बाहेर पडली, ही मध्यम प्रतीची मूर्ती. एखाद्या माणसाने अफवा ऐकली आणि ती दुसऱ्या कानाने सोडून दिली, तर त्यात समाजाचे हितही होत नाही आणि नुकसानही होत नाही. हा दुसऱ्या मूर्तीचा अर्थ.

‘तिसऱ्या मूर्तीच्या कानात घातलेली तार तेथेच अडून राहिली, ही तिसरी उत्कृष्ट मूर्ती. अफवा ऐकल्यावर जो माणूस दुसऱ्या कानाने ती सोडून देत



नाही किंवा लगेच ती दुसऱ्याला सांगत नाही, तर तिच्या खरेखोटपणाची खात्री करून घेतो आणि आपण काय ऐकले ते पुराव्याशिवाय सांगत नाही, तो माणूस उत्तम.’ हा तिसऱ्या मूर्तीचा अर्थ होय.

कलिंगच्या राजाला अप्पाजींचे उत्तर मिळाले. अप्पाजींनी तीनही मूर्तींचा दर्जा ओळखल्याने राजा संतुष्ट झाला. त्याने अप्पाजींचे व कृष्णदेवरायांचे अभिनंदन केले.

**– विलास गिते**

**शब्दार्थ:** **चतुर** – हुशार. **चवदार** – चविष्ट. **कलिंग** – एका राज्याचे नाव. **गाडीवान** – वाहक, गाडी हाकणारा. **निकृष्ट** – कमी प्रतीचे. **अफवा** – खोटी बातमी. **संतुष्ट** – समाधानी. **पुरावा** – दाखला.

## स्वाध्याय



**प्र. १. एक-दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अप्पाजींनी बैलगाडीत कशाचे पीक घ्यायला लावले?

(आ) उत्कृष्ट दर्जाची मूर्ती कोणती?

(इ) कलिंगचा राजा संतुष्ट का झाला?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) अप्पाजींनी ताजी कोबी कलिंग देशाकडे कशी पाठवली?

(आ) कलिंगच्या राजाने अप्पाजींची दुसऱ्यांदा कशी परीक्षा घेतली?

(इ) मूर्तीच्या तोंडात घातलेली तार तोंडातून बाहेर येते याचा अप्पाजींनी कोणता अर्थ लावला?

(ई) अप्पाजींच्या मते उत्तम माणूस कोणता?

**प्र. ३. पाणी टंचाईमुळे तुम्हांला पाणी दुरून आणायचे आहे. कमी श्रमात ते आणण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न कराल?**

**प्र. ४. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) हित × (आ) अवघड × (इ) निकृष्ट ×

**प्र. ५. खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे चौकट पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| गाडी–गाडीवान | चतुर–चतुराई | खरा–खरेपणा |
| ..........–धनवान | महाग–.......... | ..........– साधेपणा |
| ..........– दयावान | ..........– स्वस्ताई | ..........– शहाणपणा |
| बल– .......... | ..........–नवलाई | भोळा–.......... |

**प्र. ६. खालील शब्द वाचा व समजून घ्या.**

(अ) चतुर – चातुर्य (इ) क्रूर– क्रौर्य (उ) सुंदर – सौंदर्य

(आ) चोरी – चौर्य (ई) शूर – शौर्य (ऊ) धीर – धैर्य

**प्र. ७. खालील शब्दांना तो, ती, ते शब्द लावून लिंग ओळखा.**


(अ) दरी (इ) माठ (उ) पुस्तक


(आ) पान (ई) लाडू (ऊ) वही

**प्र. ८. तुमच्या मित्राच्या/मैत्रिणीच्या चतुरपणाचे कौतुक झाल्याचा प्रसंग घरी व वर्गात सांगा.**

**प्र. ९. अप्पाजींसारख्या अनेक चतुर व्यक्ती इतिहासात होऊन गेल्या आहेत. उदा., बिरबल, तेनालीराम. यांच्या गोष्टी मिळवा. वाचा. वर्गात सांगा.**

**प्र. १०. खालील आकृतीत दिलेल्या शब्दांस विशेषणे लावा.**




**सुविचार**

आपल्या शिक्षणाचा जो देशासाठी उपयोग करतो तो सुशिक्षित समजावा.

शिक्षण म्हणजे आपले शरीर, मन व बुद्धी यांचा विकास होय.

**सांगा पाहू.**

शर्टाच्या खिशावर
रुबाबात बसतो,
काहीही लिहिण्यासाठी
माझ्याशिवाय पर्याय नसतो.

वेली अन् वनस्पतींनी
नटले मी फुलांनी,
खेळण्यासाठी मजेत
शोधले मला मुलांनी.

- **खालील तक्ता वाचा. समजून घ्या.**

| नाम/सर्वनाम | वर्तमानकाळ | भूतकाळ | भविष्यकाळ |
|---|---|---|---|
| माया | खेळते. | खेळली. | खेळेल. |
| तो | खेळतो. | खेळला. | खेळेल. |
| तुम्ही | खेळता. | खेळलात. | खेळाल. |
| आम्ही | खेळतो. | खेळलो. | खेळू. |
| त्या | खेळतात. | खेळल्या. | खेळतील. |

- **दिलेल्या सूचनांप्रमाणे खालील वाक्यांत बदल करा.**

१. रिमा सहलीला गेली. (वाक्य भविष्यकाळी करा.)
२. मला आंबा आवडतो. (वाक्य भूतकाळी करा.)
३. चंदाने लाडू खाऊन संपवला. (वाक्य वर्तमानकाळी करा.)
४. सुभाष माझा मित्र आहे. (वाक्य भूतकाळी करा.)
५. वंदना अभ्यास करते. (वाक्य भूतकाळी करा.)
६. संजू क्रिकेट खेळतो. (वाक्य भविष्यकाळी करा.)

C75TL7

- **पूर, गाव, नगर, बाद ही अक्षरे शेवटी असणाऱ्या गावांची, शहरांची, ठिकाणांची नावे खालील तक्त्यात लिहा.**

| गाव | पूर | नगर | बाद |
|---|---|---|---|
| मानगाव | सोलापूर | अहमदनगर | औरंगाबाद |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |